ISBN -978-93-84309-11-4

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY, PUNE

NAAC Accreditation'A' Grade

**Junnar Taluka Shivner Shikshan Prasarak Mandal's**

# Shri Shiv Chhatrapati College

*Bodkenagar, Junnar (Pune)*

**National Seminar on**

# Status of Judicial Activism in India

Editor -In-Chief
**Prof. Rahul Pandit**

Principal
**Dr. Bhaskar Shelke**




Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | नाव | पान नं. |
|---|---|---|---|
| 38 | भारतीय न्यायव्यवस्थेतील कौटुंबिक न्यायालयाची भूमिका | प्रा.धिरज भिमशा शाखापुरे. | १३२-१३४ |
| 39 | न्यायालयीन स्वातंत्र्य आणि भारतीय संसद | प्रा. हारगे महादेव माणिकराव | 135.137 |
| 40 | न्यायालयीन कार्यपध्दतीत मानसशास्त्रीय संकल्पनांचे उपयोजन | प्रा. खिलारे संदीप सिताराम | 137.139 |
| 41 | जनहित याचिका व न्यायालयीन भूमिका | प्रा. शरद मनसुख | 140.141 |
| 42 | लोकशाही सशक्तीकरणासाठी न्यायालयीन सक्रियतेची भूमिका | प्रमोद भगवानराव जाधव | 142.145 |
| 43 | मानवीहक्कांचे संरक्षण व न्यायालयीन सक्रीयता | प्रा. एकनाथ वाजगे | 146.148 |
| 44 | भारतीय राज्यघटना व न्यायालयीन सक्रीयता | श्री. सचिन नागोराव कसबे | 149.151 |
| 45 | भारतीय न्यायालयीन सक्रीयता एक दृष्टीक्षेप | कुचेकर एच. एस. | 152.154 |
| 46 | न्यायालयीन सक्रियेतेच्या भूमिकेमुळे कायदेमंडळ व कार्यकारी मंडळाची कोंडी? | प्रा. राजेंद्र भोईवार | 155-157 |
| 47 | न्यायपालिकेची सक्रीयता | प्रा. चंदन गणेशराज सोनाळे | 158.159 |
| 48 | न्यायालयीन सक्रियता : कारणे आणि उपाय | प्रा. डॉ. विलास आघाव<br>प्रा. डॉ. सुधाकर भालेराव | 160.162 |
| 49 | **केशवानंद भारती खटला** | **प्रा.राहुल पंडित विशाल रणखांब** | १६३-१६४ |
| 50 | भारतातील न्यायालयीन कृतिशीलता | डॉ. बेग रेहानाआरा इस्माईल | 165.168 |
| 51 | मानवी हक्काचे संरक्षण आणि न्यायसंस्थेची भुमिका | प्रा.साळवे गौतम गणपती | 169.172 |
| 52 | जनहित याचिका :सामाजिक न्यायाची संकल्पना | प्रा. मिरकुटे ई.जी..<br>डॉ. आर . डि. शिंदे | 173.174 |
| 53 | जनहित याचिका आणि न्यायालयीन सक्रीयता | प्रा. डॉ. लक्षटे रत्नाकर बाबूराव | 175.176 |
| 54 | संसद, न्यायालये आणि संविधान | प्रा. माधव चोले | 177.179 |
| 55 | भारतातील न्यायालयीन सक्रियता : एक अभ्यास | प्रा. काटकांबळे ना. तुकाराम | 180.185 |
| 56 | राष्टीय एकातमतेत आणि न्यायववसथेत भारतीय राज्य घटनेची भूमिका | डॉ. प्रभाकर जगताप | 186.188 |
| 57 | डॉ. बी आर. आंबेडकर आणि न्यायपालिका | मकरंद रामराव गिरी | 189.192 |
| 58 | मानवी संरक्षणात्मक कायदे आणि न्यायालयाची भूमिका | प्रा. एल.एन.कुमारे | 193.195 |
| 59 | मानवी हक्क आणि न्यायव्यवस्था | बबन गोविंद राठोड | 196.197 |
| 60 | जनहित याचिकेमध्ये न्यायालयाची भूमिका | चौधरी प्रदीप विनायक | 198.200 |
| 61 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर : ग्रामीण विकास आणि न्यायविषयक दृष्टिकोन | कमले हणमंत विठ्ठलराव | 201.205 |
| 62 | भारतीय राज्यघटनेच्या संरक्षणामध्ये न्यायालयीन पुनर्विलोकनांची भूमिका | पटेकर संजय कारभारी | 206.208 |
| 63 | न्यायालयीन सक्रीयता आणि भारतीय लोकशाही | व्हि. एस. संबेटवाड | 209.210 |
| 64 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे न्यायव्यवस्थे विषयक विचार | कढरे चंद्रकांत सिध्दार्थ | 211.212 |


Scanned by CamScanner

ISBN -978-93-84309-11-4

# जनहित याचिका आणि न्यायालयीन सक्रियता

प्रा.डॉ. लक्षटे रत्नाकर बाबूराव
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय,देगलूर

जनहित याचिका म्हणजे अन्यायग्रस्त व्यक्तिऐवजी अन्य व्यक्ति आणि संघटनांनी न्यायाची मागणी करणे. तसेच जर एखादी अन्यायग्रस्त व्यक्ति न्यायासाठी न्यायालयात जाण्यास सक्षम नाही अशा स्थितीत इतर व्यक्ति किंवा इतर संघटनांना अधिकार आहे की, अन्यायग्रस्त व्यक्ति ऐवजी न्यायालयात याचिका दाखल करु शकतात. सामाजिक हिताची भावना असणाऱ्या व्यक्ति व संस्थामार्फत जर एखादा व्यक्ति सर्वसामान्य लोकांशी निगडीत प्रकरणाबाबत सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालयास पत्र लिहुन व त्याबाबत न्यायालयामार्फत चौकशी अंती जनहित याचिका दाखल केली जाते. कोणताही व्यक्ति वकीलाच्या मदतीने जनहित याचिका दाखल करु शकतो. साधे पोस्टकार्ड, तार करुन आलेल्या तक्रारीवरुन ती दाखल करुन घेतली जाते. आर्थिक व सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या व्यक्तिसाठी ही व्यवस्था आहे. ज्यातुन त्यांना न्याय मिळेल. उदा. कामगार वर्गासाठी जनहित याचिका वरदान आहे. या शिवाय भ्रष्टाचाराबाबतही जनहित याचिकेने ऐतिहासिक निर्णय दिले आहेत. जनहितासाठी कोणीही न्यायालयात खटला दाखल करु शकतो. तज्ञांनी वर्तमान पत्राच्या आधारे जनहित याचिका स्वीकारल्या व त्याबाबत महत्वपुर्ण निर्णय दिले. जनहित याचिका आणि न्यायालयीन सक्रियतेचा विस्तार समांतर रुपात झाला. जनहित याचिकांचे मध्यम वर्गाने अधिक प्रमाणात स्वागत व समर्थन केले. जनहित याचिका भारतीय राज्यघटना किंवा कोणत्याही कायदयात परिभाषित केली नाही. जनहित याचिकेस अमेरिकेत सामाजिक कार्यवाही याचिका म्हणतात. जनहित याचिका न्यायालयाचा अविष्कार आणि न्यायाधिश निर्मित कायदा आहे. लोककल्याण भावनेने कार्य करते. स्वसत व गतीशिल न्याय हे जनहित याचिकेचे ध्येय आहे. जनहित याचिका समुह हितात उपयोगी पडते न कि व्यक्ति हितात. जनहित याचिका मुलभूत अधिकाराच्या क्षेत्राचा विस्तार करते. कसा करावा याविषयीचे अज्ञान आहे.

न्यायालय गरिब, शोषित, उपेक्षित तथा पद-दलितांसाठी अंतिम ठिकाण आहे. आपले अस्तित्व, प्रतिष्ठा आणि सन्मानाचे संरक्षण करण्यासाठी प्रत्येक देशाचा सुसंस्कृत नागरिक न्यायालयाकडे जातो. प्रत्येक व्यक्तिस आपल्या हितसंबंधाच्या रक्षणाबाबत न्यायालयाकडून अपेक्षा असते. कारण तेथे त्याच्या हिताचे संरक्षण होते. न्यायालयाच्या निर्णयाचा सर्वसामान्य जनतेच्या मनावर अधिक प्रभाव असतो. प्रत्येक देशांनी आपल्या शासन व्यवस्थेत न्यायालयास आदराचे स्थान दिले. राज्य किंवा समाजाचे स्वरुप कसेही असो, विरोधाची शक्यता असल्यास, श्रेष्ठ स्वतंत्र व सजम न्यायपालिकेची नेहमीच गरज असते. कार्यपालिकेने डोळयावर रंगीत चष्मा टाकला व तिचे कान रोगग्रस्त बनले तर तिला आम आदमीचा आवाज ऐकु येत नाही. भ्रष्टाचाराने उच्छाद मांडला आहे. अशा परिस्थितीत गरीबांच्या व्यापक जनहिताचा विचार कोण करेल. तेंव्हा आम आदमीचा विश्वासाने न्याय प्रणालीकडे पाहतो. भारतीय न्यायालयाने जनहितासंदर्भातील याचिकांवर निकाल देवून त्या क्षेत्रात नवीन इतिहास जोडला आहे. जेंव्हा कोणीही नाजरिज जनसमुहाचे नुकसान व अहिताकडे सर्वोच्च किंवा उच्च न्यायालयाचे लक्ष केंद्रीत करतो, तेंव्हा न्यायालय अशा

Scanned by CamScanner

ISBN -978-93-84309-11-4

प्रकरणाचा निकाल लावून परमादेश , अधिकार पृच्छा, उत्प्रेषण, बंदी प्रात्यक्षीकरण व परमादेश सारखे नियमांना लाजु करते. अशा वेळेस याचिका दाखल करणाऱ्या व्यक्तिच्या अधिकाराचे उल्लंघन झाले किंवा नाही याकडे न्यायालय न पहाता सर्वसामान्यांच्या नुकसानाचे आकलन करते.

जनहित याचिकेच्या विकासानंतरची प्रक्रिया न्यायालयीन सक्रियतेशी संबंधित आहे. न्यायालयीन सक्रियता केंव्हा केंव्हा सामाजिक सक्रियता म्हणूनही पुढे येते. न्यायाधीश कोणत्याही वर्गातील असो, जेंव्हा त्याच्यासमोर जनहिता संदर्भात प्रकरण येते तेंव्हा तो डोळे झाकून विचार करु शकत नाही

२०१४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाने आघाडी सरकारच्या काळात १०२ घोटाळे, ११ लाख ८८ हजार कोटींचा भ्रष्टाचार, ५० हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या अशी जाहिरात केली. त्याविषयी जनहित याचिका दाखल झाली.

२०१४ लोकसभा निवडणुकीत २ लाख १० हजार १२३ मतदारांची नावे वगळण्यात आली. डॉ.दाभोळकर नरेंद्र यांच्या हत्येचे प्रकरण, अच्छे दिन केंव्हा येणार ? आदर्श घोटाळा, संजय दत्तला नेहमी मिळणारी पॅरोल, पीके चित्रपटातील अमीर खानचे अर्ध नग्न चित्र, राधे मॉ, ओपन जिम, कॉल ड्रॉप, कुंभमेळा पुरेशी सुरक्षा, दुहेरी नागरिकत्व, मालेगाव विस्फोट, बाबासाहेब पुरंदरेना दिलेला महाराष्ट्र भुषण पुरस्कार, बजरंगी भाईजान चित्रपट, टोल प्रश्न, अनिधकृत बांधकाम, मराठा आरक्षण, एफटीआय आंदोलन ई.प्रकरणी न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली.

न्यायालयास आपल्या निर्णयांना लागु करण्यासाठी शेवटी कार्यकारीमंडळ आणि कायदेमंडळावरच अवलंबून रहावे लागते. संविधानातील या दोन अंगावर व त्यांच्या सहकार्यावरच न्यायालयाचा सम्मान अवलंबुन आहे. शेवटी न्यायालयाने आपला निर्णय देताना त्याच्या व्यावहारिक घटकाप्रति अधिक जागरुक असावे. कोणत्या निर्णयाने व कार्याने सामाजिक न्यायाची स्थापना होईल. याकडे न्यायालयाचे अधिक लक्ष व भर असतो. तरीही न्यायालयीन सक्रियतेस अधिक संतुलित रित्या जिवंत ठेवावे लागेल. तसेच यामुळे राज्याच्या विभिन्न अंगातील सत्ता विकेंद्रीकरणाच्या संकल्पनेस धक्का बसेल. शेवटी न्यायालयालाच आत्मनियंत्रीत राहुन न्यायालयीन सक्रियतेच्या प्राप्तीसाठी कार्य करावे लागेल. न्यायालयात वकिल, कर्मचारी, उच्च न्यायालय, सत्र न्यायालय, कनिष्ठ न्यायालय, न्यायाधिश व सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्याचा अभाव असणे हे जनहित याचिका व न्यायालयीन सक्रियतेच्या यशस्वीतेसमोरचा अडथळा आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


१) २१ व्या शतकातील बदलते समाजकारण आणि राजकारण - डॉ.अलका देशमुख - साईनाथ प्रकाशन, नागपूर

२) भारतीय राज्यघटना राष्ट्राची कोनशिला - ग्रॅनव्हिल औस्टिन - अनुवाद - भारती केळकर - डायमंड पब्लिकेशन्स पुणे.

३) इमॅर्जिनिंग इंडिया - नंदन निलकेणी - अनुवाद - अपर्णा वेलणकर , मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

४) भारताच्या संसदीय लोकशाहीची अग्निपरिक्षा - माधव गोडबोले - अनुवाद - सुजाता गोडबोले - राजहंस प्रकाशन, पुणे.




Scanned by CamScanner